POSTAL REGISTRATION : PLG/255/2023-2025

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०४ ● अंक-३५५ ● मुंबई, शनिवार, २६ जूलै २०२५ ● पृष्ठ-८ ● म्ह्यूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

## ... तर धनंजय मुंडेंना पुन्हा संधी देऊ

### कृषिमंत्र्यांच्या राजीनामा अन् मुंडेंच्या वापसीवर स्पष्टच बोलले 'दादा'



**■पुणे। प्रतिनिधी,**

राज्यातील कृषिमंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी जोर धरत असताना उपमुख्यमंत्री अजित पवारांनी मंगळवारी याबाबतचा निर्णय घेतला जाईल, असे स्पष्ट केले आहे. त्यातच, आज पुण्यातील बैठकानंतर त्यांनी माध्यमांशी संवाद साधताना विविध विषयांवर चर्चा केली. माणिकराव कोकाटे यांच्या राजीनाम्यासंदर्भात बोलताना आमदार धनंजय मुंडेंच्या मंत्रिमंडळातील पुनर्वसनावरही त्यांनी भाष्य केलं आहे. तसेच, पुण्यातील गुन्हेगारी, छावाचे विजय घाडगे यांची भेट, रोहित पवारांकडून फोन टॅपिंगसंदभार्तील आरोपावरही अजित पवार स्पष्टपणे बोलले. मी सकाळी आल्यावर सीपींना सांगितलं आहे. पुण्यात काहीजण गुंडगिरी निर्माण करण्यासाठी तोडफोड करतात, त्या आरोपींना पकडा आणि कारवाई करा, पुन्हा असं धाडस करता कामा नये असे पालकमंत्री पवार यांनी म्हटले.

पुण्यात छावाचे प्रदेशाध्यक्ष विजय घाडगे यांनी अजित पवारांची भेट घेतली, या भेटीची त्यांनी माहिती दिली. विजय घाडगे हे मुंबईत माझी भेट घेणार होते, फोन किंवा आणि व्हिडीओ कॉलवर संपर्क करणार होतो. मात्र, त्यांनी ऐकलं नाही, त्यांनी त्यांची बाजू मांडली. मारहाण करण्याचं काही कारणं नव्हतं, असं त्यांनी सांगितलं.जे घडलं ते चुकीचे झालं आहे, ज्यांनी त्यांना मारहाण केली त्यांच्या पदाचा राजीनामा पक्षाने घेतला असून पदापासून मुक्त केल्याचं अजित पवारांनी सांगितलं. तसेच, मुख्यमंत्र्यांशी चर्चा करुन माणिकराव कोकाटेंच्या राजीनाम्याचा निर्णय घेऊ, असेही ते म्हणाले. दरम्यान, धनंजय मुंडेंच्या पुनर्वसनावरही अजित पवार स्पष्ट बोलले.

**कृषी घोटाळयात क्लीन चीट**

धनंजय मुंडेंच्या प्रकरणात त्यांच्यावर कृषी खात्यात घोटाळा केल्याचे आरोप झाले, माध्यमांतही ते आले. पण, न्यायालयाने काय सांगितलं, त्यांना न्यायालयाने क्लिनचीट दिली. मात्र, जी बदनामी व्हायची ती झाली, आता त्यांच्याबद्दल आणखी एक दुसरी चौकशी सुरू आहे, त्याबाबतही पोलीस यंत्रणा कारवाई करत आहे. पण, कृषि खात्यातील भ्रष्टाचाराबद्दल त्यांना, त्यांच्या कुटुंबीयांना जो मनस्ताप सहन करावा लागला, जो त्रास सहन करावा लागला तो भरुन येऊ शकत नाही ना, असा सवाल अजित पवारांनी उपस्थित केला.

**तर धनंजय मुंडेंना पुन्हा संधी दिला जाईल**

कृषि बाबतीत त्यांच्यावर जे आरोप झाले, त्यांस न्यायालयाने निर्णय दिला असून क्लिन चीट दिली आहे. तर, याचिकाकर्त्यास दंडी ठोठावल्याचे अजित पवारांनी म्हटले. तसेच, धनंजय मुंडेंना पुन्हा संधी दिली जाईल का? असा प्रश्न विचारला असता, अजून एका गोष्टीसंदर्भात माहिती आम्ही घेत आहोत. त्या प्रकरणाची न्यायालयीने चौकशी सुरू आहे, या चौकशीनंतर वस्तुस्तिथी पुढं येईल. वस्तुस्थिती पुढं आल्यानंतर त्यांचा दुरान्वये संबंध नसेल तर त्यांना पुन्हा संधी दिली जाईल, असे म्हणत धनंजय मुंडेंच्या पुनर्वसनसंदर्भात अजित पवारांनी मोठं वक्तव्य केलं आहे.

**केवळ आरोप नको, पुरावे द्या**

दरम्यान,रोहित पवारांनी केलेल्या फोन टॅपिंगच्या आरोपावर बोलताना अजित पवार म्हणाले, आरोप करणाऱ्यांनी जरुर करावेत, पण नुसते आरोप करायचे नाहीत, पुरावे दिले पाहिजे.

## माणिकराव कोकाटे सोमवारी राजीनामा देणार?



राजकीय वतुर्ळात घडामोडींना वेग आला आहे. गेल्या काही दिवसांमध्ये काही मंत्र्यांचे वादग्रस्त व्हिडीओ समोर आले आहेत, या पार्श्वभूमीवर देवेंद्र फडणवीस यांनी आधीच उपमुख्यमंत्री अजित पवार आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे तीव्र नाराजी व्यक्त केली असल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे. त्यानंतर आज देवेंद्र फडणवीस यांनी दिल्लीमध्ये केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेतली, दोन्ही नेत्यांमध्ये 25 मिनिटं चर्चा झाली, ही चर्चा वादग्रस्त मंत्र्यांच्या राजीनाम्या संदर्भात होती, अशी माहिती सूत्रांकडून मिळत आहे, मात्र या चर्चेबाबत अद्याप कोणतीही अधिक माहिती समोर आलेली नाहीये. फडणवीस यांचा हा दिल्ली दौरा वादळी ठरण्याची शक्यता आहे.

मोठी बातमी समोर येत आहे, सभागृहात मोबाईलवर रमी खेळतानाचा व्हिडीओ समोर आल्यानं कृषीमंत्री माणिकराव कोकाटे चांगलेच अडचणीत आले आहेत. दरम्यान आता राजकीय वर्तुळातून मोठी बातमी समोर येत आहे, ती म्हणजे माणिकराव कोकाटे यांचा राजीनामा जवळपास निश्चित झाला असून, ते सोमवारी राजीनामा देण्याची शक्यता आहे, मंगळवारी कॅबिनेटची बैठक आहे, त्यापूर्वी माणिकराव कोकाटे राजीनामा देण्याची शक्यता आहे. दुसरीकडे आज छावा संघटनेचे नेते विजय घाडगे यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांची भेट घेतली आहे. कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांच्यासंदर्भात येत्या मंगळवारपर्यंत निर्णय घेतला जाईल असा शब्द अजित पवार यांनी दिल्याचा दावा विजय घाडगे यांनी केला आहे. तसेच सूरज चव्हाण यांना पुन्हा पक्षात घेणार नसल्याचंही अजित पवार यांनी यावेळी म्हटल्याची माहिती विजय घाडगे यांनी दिली आहे, त्यामुळे माणिकराव कोकाटे हे सोमवारी राजीनामा देऊ शकतात अशी आता चर्चा सुरू झाली आहे. माणिकराव कोकाटे यांचा राजीनामा घ्यावा, यासाठी राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांना निवेदन देण्यासाठी गेलेल्या विजय घाडगे यांना मारहाण झाल्याचा प्रकार समोर आला होता, या प्रकरणात सूरज चव्हाण यांच्यावर कारवाई करण्यात आली आहे. त्यांना पुन्हा पक्षात घेणार नाही, असं अजित पवार यांनी म्हटल्याचं विजय घाडगे यांनी यावेळी सांगितलं.

## त्र्यंबकेश्वर मंदिरात स्पेशल पास घोटाळा उघड

### वेबसाईटच्या माध्यमातून तिकिटांचा काळाबाजार उघडकीस




**■नाशिक(त्र्यंबकेश्वर) । प्रतिनिधी,**

राज्यातील एक प्रमुख तीर्थक्षेत्र असलेल्या त्र्यंबकेश्वर मंदिरात स्पेशल दर्शन पासच्या नावावर मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार उघडकीस आला आहे. अधिकृत वेबसाईटचा गैरफायदा घेत, काही दलाल व एजंटांनी ऑनलाईन तिकीट प्रणालीचा वापर करून स्पेशल पासचा काळाबाजार सुरू केल्याचे समोर आले आहे. मंदिर प्रशासनाच्या वेबसाईटवरून मिळणाऱ्या सीमित स्पेशल पासना कृत्रिमरीत्या अ‍ॅडव्हान्स बुक करून, त्यांची खाजगी स्तरावर जास्त दरात विक्री केली जात असल्याचे अनेक भक्तांनी निदर्शनास आणले. यामुळे श्रद्धाळूंमध्ये संतापाची लाट उसळली आहे. काही तक्रारीनुसार, २०० ते ३०० रुपयांचे स्पेशल पास तब्बल १००० ते १५०० रुपयांपर्यंत विकले जात होते. यात संगनमताने एक यंत्रणा कार्यरत असल्याचा संशय व्यक्त होत आहे. त्यामुळे सामान्य भाविकांना ऑनलाईन बुकिंगमध्ये अडचणी येत होत्या, तर दुसरीकडे दलालांकडे सहज उपलब्धता दिसून येत होती. या प्रकरणाची गंभीर दखल घेऊन प्रशासनाने चौकशीचे आदेश दिले असून, संबंधित वेबसाईटची तांत्रिक तपासणी सुरू आहे. तक्रारींचे गांभीर्य लक्षात घेता, सायबर क्राइम विभागाचाही यात समावेश केला जाणार असल्याचे सूत्रांकडून समजते. भाविकांच्या श्रद्धेचा असा गळचेपा होणे अत्यंत दुर्दैवी असून, दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी अशी मागणी समाजातून होत आहे. डिजिटल तंत्रज्ञानाच्या नावाखाली होणारा असा भ्रष्टाचार रोखण्यासाठी अधिक मजबूत यंत्रणा उभारणे काळाची गरज बनली आहे.

## महाराष्ट्रात आंतरराष्ट्रीय ड्रग्ज रॅकेट सक्रीय... पोलिसांना सापडलं ५० कोटींचे घबाड

**■जळगाव । प्रतिनिधी,**

गेल्या काही दिवसांपासून महाराष्ट्रात अनेक ठिकाणी ड्रग्ज सापडत आहे. पोलिसांकडून केल्या जाणाऱ्या छापेमारीत ठिकठिकाणी लाखो, कोट्यावधी रुपयांचे ड्रग्ज मिळत आहेत. त्यातच आता जळगाव जिल्ह्यातील चाळीसगाव तालुक्यातून एक मोठी आणि धक्कादायक बातमी समोर येत आहे. जळगावातून सुमारे ४० ते ५० कोटी रुपये किमतीचे ३९ किलो ॲम्फेटामाईन ड्रग्ज जप्त करण्यात आले आहे. जळगावातील महामार्ग पोलिसांनी बोढरे फाटा परिसरात ही कारवाई करण्यात आली. या कारवाईमुळे परिसरात खळबळ उडाली आहे.

**नेमकं काय घडलं?**

जळगावातील महामार्ग पोलिसांनी बोढरे फाट्याजवळ नाकाबंदी लावली होती. यावेळी दिल्लीहून बंगळुरूकडे जाणाऱ्या एका ब्रेझा कारला महामार्ग पोलिसांनी बोढरे फाट्याजवळ तपासणीसाठी थांबवले. त्यावेळी कारची कसून तपासणी करण्यात आली आहे. यावेळी गाडीच्या विविध भागांमध्ये अत्यंत घातक असलेला ॲम्फेटामाईन हा अंमली पदार्थ लपवलेल्या आढळून आले. या ड्रग्जची आंतरराष्ट्रीय बाजारभावानुसार किंमत ४० ते ५० कोटी रुपये असल्याचा अंदाज आहे. यानंतर पोलिसांनी तातडीने कार चालकाला ताब्यात घेतले असून, वाहनही जप्त करण्यात आले आहे.

**आरोपी सराईत ड्रग्ज तस्कर**

पोलिस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, अटक करण्यात आलेल्या आरोपीविरोधात यापूर्वीही एनडीपीएस कायद्यानुसार गुन्हा दाखल आहे. त्यामुळे हा आरोपी सराईत ड्रग्ज तस्कर असण्याची शक्यता वर्तवली जात आहे. या घटनेची माहिती मिळताच पोलीस अधीक्षक डॉ. महेश्वर रेड्डी यांनी मध्यरात्रीच घटनास्थळी धाव घेतली.




**आंतरराष्ट्रीय ड्रग्ज रॅकेट असण्याची शक्यता**

या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन आमदार मंगेश चव्हाण यांनी तात्काळ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना फोनवरून या घटनेची माहिती दिली. या कारवाईमागे आंतरराष्ट्रीय ड्रग्ज रॅकेट असण्याची शक्यता आमदार चव्हाण यांनी वर्तवली आहे. या मोठ्या ड्रग्ज जप्तीमुळे जळगाव जिल्ह्यात अमली पदार्थ तस्करांचे जाळे किती खोलवर पसरले आहे, याचा अंदाज येत आहे. पोलीस या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत.

### ड्रग तस्करी करणाऱ्यावर मकोका लावणार

दरम्यान काही दिवसांपूर्वी विधानसभेच्या पावसाळी अधिवेशनादरम्यान भाजपचे आमदार परिणय फुके यांनी याबाबत सभागृहात सवाल केला होता. राज्यात मेफेड्रोनची तस्करी मोठ्या प्रमाणात वाढली आहे. त्यामुळे कारवाई करण्याची गरज आहे. ड्रग्सचा विळखा पडतो आहे. आपली संख्या त्यात सर्वाधिक आहे. तस्करीचं प्रमाणही वाढलं आहे. त्यामुळे या सर्वांवर मकोका लावून कारवाई करणार का? ड्रग्स तस्करी करणाऱ्यांना लगेच जामीन मिळतो. त्यामुळे या केसेस फास्टट्रॅक कोर्टात घेणार का? असा सवाल परिणय फुके यांनी केला होता. राज्यात ठिकठिकाणी ड्रग आणि अमली पदार्थांची तस्करी होतेय. यावर शासनाने योग्य ती पावले उचलली पाहिजेत. ड्रग्सची तस्करी रोखण्यसाठी टास्क फोर्स केली होती त्याच काय झालं? असा सवाल फुके यांनी केला होता. त्यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उत्तर दिलं होतं. ड्रग तस्करी संदर्भात मकोका लावत येईल का? यावर आपण या अधिवेशनात नियमावली आणत आहोत. कायद्यात आपण बदल करून ड्रग तस्करी करणाऱ्यावर मकोका लावण्यासंदर्भात कायद्यात सुधारणा करणार आहोत, अशी माहिती फडणवीस यांनी दिली होती.

## सूरज चव्हाणांसाठी राष्ट्रवादीचे दरवाजे बंद, अजित पवारांचा निर्णय



### सूरज चव्हाण यांच्यासाठी राष्ट्रवादीचे दरवाजे बंद

अजित पवार यांनी आज छावा संघटनेचे कार्यकर्ते विजय घाडगे यांची भेट घेतली. यावेळी अजित पवारांनी काय म्हटलं याची माहिती घाडगे यांनी दिली आहे. सूरज चव्हाण यांना आता पुन्हा पक्षात घेतलं जाणार नाही असं अजित पवारांनी म्हटलं असल्याचे घाडगे यांनी सांगितले आहे. त्यामुळे आता या मारहाणीच्या प्रकरणामुळे सूरज चव्हाण यांची राजकीय कारकीर्द धोक्यात आली आहे.

**■मुंबई । प्रतिनिधी,**

कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांचा रमी खेळतानाचा व्हिडिओ झाल्यानंतर राजकारण पेटलं आहे. लातूरमध्ये राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांना छावा संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी कोकोटेंच्या राजीनाम्याबाबत निवेदन दिले होते. मात्र यानंतर राष्ट्रवादीचे पदाधिकारी आणि छावा संघटनेच्या कार्यकर्त्यांमध्ये जोरदार राडा झाला होता. यावेळी राष्ट्रवादीचे नेते सूरज चव्हाण यांनी विजय घाडगे यांनी मारहाण केली होती. त्यानंतर आता सूरज चव्हाणांना याचा मोठा फटका बसला आहे.

लातूरमधील राड्यानंतर राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सूरज चव्हाण यांच्यावर पक्षाने कारवाई केली होती, त्यांना पदाचा राजीनामा देण्याचे आदेश देण्यात आले होते. 'लातूरमध्ये घडलेल्या अत्यंत गंभीर आणि निषेधार्ह घटनेच्या पार्श्वभूमीवर, मी राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सूरज चव्हाण यांना त्यांच्या पदाचा त्वरित राजीनामा द्यायच्या स्पष्ट सूचना दिल्या आहेत. पक्षाच्या मूल्यांच्या विरोधात जाऊन केले जाणारे वर्तन कोणत्याही स्थितीत स्वीकारले जाणार नाही, यासाठी हा कठोर निर्णय घेतला आहे' असं अजित पवार यांनी ट्वीट करत म्हटलं होतं.

**सुनील तटकरेंकडून जाहीर नाराजी**

सुनील तटकरे यांच्या पत्रकार परिषदेत कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांच्याविरोधात निवेदन द्यायला आलेल्या छावा संघटनेच्या कार्यकर्त्यांनी तटकरे यांच्यासमोर पत्ते फेकले होते. यानंतर राडा झाला होता. यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनीही सूरज चव्हाण यांच्या कृत्याबद्दल जाहीर नाराजी व्यक्त केली होती.

## खासगी क्लासमधील वादातून विद्यार्थिनीच्या आईला घरात घुसून मारहाण


**■संभाजीनगर। प्रतिनिधी,**

संभाजीनगरमधील सातारा परिसरातील सर्वेश्वरनगर येथे एक धक्कादायक प्रकार घडला असून खासगी क्लासमध्ये किरकोळ वाद झाल्याच्या पार्श्वभूमीवर एका विद्यार्थिनीच्या पालकांनी दुसऱ्या विद्यार्थिनीच्या आईला घरात घुसून मारहाण केल्याची घटना घडली आहे. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली असून याप्रकरणी संदीप लंके, त्याची पत्नी आणि आणखी दोन जणांवर ॲट्रॉसिटी आणि मारहाणीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**पती–पत्नीसह दोघांवर गुन्हा दाखल**

दुसऱ्या दिवशी सकाळी आरोपी संदीप लंके आणि त्याच्या पत्नीने पुन्हा त्या विद्यार्थिनीच्या घरी धाव घेतली आणि थेट घरात घुसून विद्यार्थिनीच्या आईला कोंडून ठेवत मारहाण केली. या हल्ल्यात विद्यार्थिनीची आई गंभीर जखमी झाली. तिचा मानसिक आणि शारीरिक छळ झाल्याचे तिने म्हटले. त्यानंतर तिने पोलिसात संदीप लंके आणि त्याच्या पत्नीविरोधात तक्रार दाखल केली. पीडितेच्या तक्रारीनंतर सातारा पोलिस ठाण्यात संदीप लंके, त्याची पत्नी आणि दोन अज्ञात व्यक्तींवर रउ-रळ अत्याचार प्रतिबंधक कायदा ॲट्रॉसिटी आणि इतर कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणी सातारा पोलीस ठाण्याचे अधिकारी संपूर्ण घटनेचा तपास करत आहेत.



### खासगी शिकवणीतून वादाची सुरुवात

संभाजीनगरमधील सातारा येथील एका खासगी शिकवणीमध्ये दोन मुलींमध्ये किरकोळ कारणावरून वाद झाला. या वादावर क्लासच्या प्राध्यापकांनी हस्तक्षेप करत दोघींनाही इतर विद्यार्थ्यांसमोर माफी मागायला लावली. यामुळे एका मुलीला लाजिरवाणं वाटलं व तिच्या मनात मानसिक त्रास निर्माण झाला. तिने हा संपूर्ण प्रकार आपल्या पालकांना सांगितला. ही बाब समजताच संबंधित मुलीच्या वडिलांचा राग अनावर झाला. त्यानंतर त्यांनी आपल्या मुलीच्या मैत्रिणीच्या घरी जाऊन ह्यभाऊ पोलिस आहेह्व म्हणत मोठ्या आवाजात अरेरावी केली आणि शिवीगाळ केली. यावेळी तिथे असणाऱ्या आजोबांनी मध्यस्थी करत हा वाद मिटवला. मात्र, हा विषय यावरच संपला नाही.

घरात घुसून मारहाण, जातिवाचक शब्दांचा वापर आणि महिलेला लज्जास्पद वागणूक दिल्याचा गंभीर आरोप असल्यामुळे गुन्हा ॲट्रॉसिटी कायद्यानुसार नोंदवण्यात आला आहे. पोलिसांनी घटनास्थळाची पाहणी केली असून, लवकरच आरोपींना अटक करण्यात येईल अशी माहिती सूत्रांकडून मिळाली आहे. स्थानिक नागरिकांनी लवकरात लवकर यांच्यावर कठोर कारवाई करावी अशी मागणी केली आहे.

## शस्त्रक्रिया झालेल्या रुग्णाच्या अंगावर चढल्या मुंग्या अन्...

**■उल्हासनगर। प्रतिनिधी,**

वर्ध्याच्या हिंगणघाट येथील उपजिल्हा रुग्णालयात एक धक्कादायक घटना उघडकीस आली आहे.. शस्त्रक्रिया झालेल्या रुग्णाच्या अंगावर मुंग्याच मुंग्या चढल्या आहेत. शस्त्रक्रियेनंतर रुग्णाला आंतररुग्ण वॉर्डमध्ये भरती ठेवल्यानंतर सदर घटना घडली. शस्त्रक्रिया करण्यात आली,यावेळी सदर व्यक्ती सुंगणी दिल्याने बेशुद्ध अवस्थेत होता. नजीकच्या चिचघाट (लाडकी) येथील रुग्णावर रूग्णालयात शस्त्रक्रिया करण्यात आली होती. शस्त्रक्रियेनंतर या रुग्णाला पुरुष आंतररुग्ण वॉर्डमध्ये दाखल करण्यात आले, तेथे त्याचे सर्वांगावर मुंग्या चढल्या. ही बाब लक्षात आल्यानंतर त्याच्या सोबतच्या मित्राने याची माहिती वार्डमधील उपस्थित कर्मचाऱ्यास दिली. रुग्णाला शस्त्रक्रिया कक्षात नेऊन पुन्हा तपासणी करण्यात आली आणि मुंग्या काढून टाकल्यानंतर रुग्णाची स्वच्छता करण्यात आली. शस्त्रक्रिया झालेल्या रुग्णाचे शरीरावर मुंग्यांचा मोठ्या प्रमाणात प्रकोप झाल्याचे घटनेने रुग्णालयाच्या स्वच्छतेवर तसेच रुग्णांच्या काळजीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे.



रुग्णालयाच्या परिसरात मुंग्यांचा मोठ्या प्रमाणात प्रादुर्भाव झाला असल्याची कबुली दिली आहे. या घटनेमुळे रुग्णालयाच्या वैद्यकीय सेवेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाला असून रुग्णांच्या सुरक्षिततेबद्दल चिंता निर्माण झाली आहे. यासोबतच हिंगणघाटच्या उपजिल्हा रुग्णालयात अनेक सुविधांचा अभाव दिसून येतो.संबंधित घटनेची चौकशी केली जाणार असल्याचे सांगितले. तपासात कोणी दोषी आढळल्यास कारवाईसुध्दा करण्यात येणार असल्याची माहिती यावेळी दिली.

## २ मित्रांकडूनच आठ वर्षीय बालकाचा खून

**■भोकरदन। प्रतिनिधी,**

भोकरदन शहरातील जोमाळा परिसरात आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत असलेल्या निवासी वसतिगृहातील एका आठ वर्षीय मुलाचा मंगळवारी (दि.२२) रात्री गळा आवळून दोन मित्रांनी खून केल्याची धक्कादायक घटना घडली. या प्रकरणी पोलिसांनी दोन विधिसंघर्षग्रस्त बालकांना ताब्यात घेतले आहे. दोरीच्या सहाय्याने गळा आवळून चिमुकल्याचा खून करण्यात आल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.

बालवीर अजय पवार (वय आठ) असे खून झालेल्या मुलाचे नाव आहे. तो गणपती विद्यालयात दुसऱ्या वर्गात शिकतो. पोलिसांना या घटनेची माहिती कळताच त्यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. प्रथमदर्शनी बालवीरच्या गळ्यावर दोरीने आवळल्याचे दोन गोलाकार काळे व्रण दिसून आले. पोलिसांनी तातडीने त्या दृष्टीने तपास सुरू केला. वसतिसगृहात साध्या वेषात जाऊन चॉकलेट देत मुलांना विश्वासात घेतले. वेगवेगळ्या रूमामध्ये विविध पद्धतीने त्यांना गोष्टी सांगून त्यांच्याकडून घटनेची माहिती घेतली व अखेर दोन तासांनंतर या खुनाचा उलगडा झाला.




ही घटना अतिशय धक्कादायक असून, हॉस्टेलमध्ये सीसीटीव्ही, मोबाईल व इतर गोष्टी नसल्यामुळे पोलिसांनी तांत्रिकदृष्ट्या तपास शक्य नव्हता. लहान मुलांना व पालकांना विश्वासात घेऊन तसेच वसतिगृहाच्या कर्मचार्यांची स्वतंत्र चौकशी करण्यात आली, असे पोलिस निरीक्षक बिडवे यांनी सांगितले.

या वसतिसगृहात साधारण २५० ते ३०० मुले आहेत. तीस मुले एका रूममध्ये आहेत. एकावर एक डबल बेड अशा पद्धतीने मुलांची झोपण्याची व्यवस्था आहे. बालवीर व खून करणार्या एका बालकाचे आदल्या दिवशी किरकोळ कारणावरून भांडण झाले होते. रात्री बारा ते तीन वाजेदरम्यान यातील एका बालकाने बालवीरच्या गादी खालून दोरी काढली व अन्य एका दुसऱ्या रूममधील बालकाने बालवीरच्या बेडजवळ येऊन दोघांनी त्याचा गळा आवळून खून केला, असे पोलिसांनी सांगितले.

**आईने हंबरडा फोडला...**

बालवीर चे पालक परतूर तालुक्यातील पाडळी येथे राहतात. गावोगावी जाऊन खेळणे विक्री करून या परिवाराचा उदरनिर्वाह आहे. बालवीर व मुलगी गौरी यांना पालकांनी श्री गणपती हॉस्टेल येथे सोडले होते. वसतिगृहातील मुलांचे हे दुसरे वर्ष आहे. मंगळवारी सकाळी बालवीरची आई नातेवाइकांसोबत गजानन महाराज पालखीसोबत लहान मुलांचे खेळणे विक्री करण्यासाठी जालन्यात आली असता अचानक वसतिगृहाचे व्यवस्थापक माऊली तोटे यांनी त्यांना बोलावून घेतले. मुलगा आजारी असल्याचे सांगत ग्रामीण रुग्णालयात येण्यास सांगितले. तेथे मुलाचा मृतदेह पाहताच आईने हंबरडा फोडला.

**दोरी बाहेर फेकली**

दोरीने फास देताना विधिसंघर्षग्रस्त एका बालकाच्या डोक्याला जखम झाली होती. खुनासाठी वापरलेली दोरी हॉस्टेलच्या खिडकीतून मुलांनी खाली फेकली होती. तीही जप्त करण्यात आली आहे.

आदिवासी प्रकल्प कार्यालय संभाजीनगर येथील सहाय्यक प्रकल्प अधिकारी उद्धव वायाळ व भगवान कदम यांनी कुटुंबीयांची भेट घेत त्यांचे सांत्वन केले. पोलिस अधीक्षक अजय कुमार बंसल यांनी दुपारी वसतिगृहाला भेट दिली. यावेळी पोलिस उपाधीक्षक अनंत कुलकर्णी, स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाचे पोलिस निरीक्षक पंकज जाधव, सहाय्यक पोलिस निरीक्षक वैशाली पवार, पोलिस निरीक्षक किरण बिडवे, पोलिस उपनिरीक्षक पवन राजपूत, भाऊसाहेब सहाने उपस्थित होते.

### 'या' जिल्ह्यातील सर्व शाळा महाविद्यालयं राहणार बंद

**■भोकरदन। प्रतिनिधी,**

हवामान खात्याने पालघर जिल्ह्यात उद्या पावसाचा रेड अलर्ट दिला आहे. त्या पार्श्वभूमीवर खबरदारी म्हणून जिल्ह्यातील अंगणवाडी, शाळा आणि महाविद्यालयांना सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. मुसळधार पावसाच्या शक्यतेमुळे खबरदारी घेत जिल्हाधिकारी इंदूराणी जाखड यांनी हा आदेश काढला आहे. यामुळे जिल्ह्यातील सर्व शाळा, महाविद्यालयं उद्या म्हणजेच 26 जुलैला बंद राहणार आहेत. पालघर जिल्ह्यात उद्या मुसळधार पावसाची शक्यता आहे. पालघर जिल्ह्याला शुक्रवारी पावसाचा ऑरेंज अलर्ट देण्यात आला होता. तसंच उद्या रेड अलर्ट जाहीर करण्यात आला आहे. जिल्ह्यातील काही भागात आज पावसाची संततधार सुरू आहे. हवामान विभागाने (क्टऊ) मुंबई, नवी मुंबई आणि ठाणे येथे ऑरेंज अलर्ट जारी केला आहे, ज्यामध्ये पुढे आणखी जोरदार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. तसंच रायगड, रत्नागिरी येथेही रेड अलर्ट जारी केला आहे, शुक्रवारी काही ठिकाणी ''मुसळधार ते अतिमुसळधार पाऊस'' आणि काही ठिकाणी अत्यंत मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता वर्तवली होती. सातारा आणि पुण्याच्या घाट भागातही रेड अलर्ट कायम ठेवण्यात आला आहे.

# बो-टाय पास्ता सॅलड

**साहित्य :** १ वाटी बो-टाय पास्ता (टायचा बो अर्थात गाठीप्रमाणे आकार असलेला पास्ता), १०० ग्रॅम बोनलेस चिकन, ३ ब्रेड स्लाइस, ४-५ लसूण पाकळ्या, ५० ग्रॅम ऑलिव्ह तेल, १०० ग्रॅम प्रोसेस्ड चीझ, २ अंड्यांचे पिवळे बलक, मीठ चवीनुसार, ८-१० लेट्युसची पाने, हवे असल्यास चिली फ्लेक्स.



**कृती :** सगळ्यात आधी पास्ता मिठाच्या उकळत्या पाण्यातून उकडून घ्या. बो-टाय पास्ता मिळाला नाही किंवा आवडत नसेल तर मॅक्रोनी किंवा तुमच्या आवडीचा पास्ता घेता येईल. पास्ता उकडल्यावर लगेचच पाण्याखाली गार करा आणि थोडं तेल लावून फ्रीजमध्ये ठेवा. लसणीचे बारीक बारीक तुकडे करून घ्या. चिकनला मीठ, मिरपूड लावून पॅनमध्ये थोड्याशा ऑलिव्ह तेलात शिजवून घ्या. ब्रेड स्लाइसचे छोटे छोटे चौकोनी तुकडे करून ते पॅनमध्ये भाजून घ्या. यात थोडंसं तेल आणि लसूण घालून त्याला छान लसणीचा स्वाद येऊ द्या. चीझ किसून ठेवा. अंड्याचे पिवळे बलक चांगले लुसलुशीत होईपर्यंत फेटून घ्या. त्यात चीझ घाला आणि थोडंसं ऑलिव्ह तेल घाला. मिश्रण फेटून घ्या.

एका बाऊलमध्ये लेट्युसची पाने, पास्ता, चिकन आणि ब्रेडचे तुकडे एकत्र टॉस करा. त्यावर बनवलेले चीझ आणि अंड्याचे ड्रेसिंग वाढा. आता हे सॅलड थंड करून पेश करा.

# फेस स्क्रब डोळ्यांच्या पापण्यांवर वापरणे योग्य आहे का?

**जर तुम्ही वारंवार मेकअप करीत असाल तर शक्य असेल तेव्हा मेकअप करणे टाळा. प्रत्येकवेळी मेकअप केल्यावर तो एखाद्या चांगल्या क्लिनझरने काढून टाका. ब्युटी एक्स्पर्ट आश्मीन मुंजल यांच्याकडून जाणून घेऊयात डोळ्यांच्या पापण्यांची निगा कशी राखावी.**

**संपूर्ण** चेहऱ्यात डोळे हा फार नाजूक अवयव आहे. त्यात डोळ्यांच्या पापण्या हा तर अति संवेदनशील भाग आहे. त्यामुळे निरोगी राहण्यासाठी व सौंदर्य टिकवण्यासाठी त्यांची डोळ्यांची योग्य निगा राखणे फार गरजेचे आहे.

जर तुम्ही वारंवार मेकअप करीत असाल तर शक्य असेल तेव्हा मेकअप करणे टाळा. प्रत्येक वेळी मेकअप



केल्यावर तो एखाद्या चांगल्या क्लिनझरने काढून टाका. ब्युटी एक्स्पर्ट आश्मीन मुंजल यांच्याकडून जाणून घेऊयात डोळ्यांच्या पापण्यांची निगा कशी राखावी.

सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे डोळ्यांच्या पापण्यांवर कधीही स्क्रब वापरू नका. कारण तुमच्या पापण्यांवरील अतिसंवेदनशील त्वचा व पापण्यांवरील केस यावर अति सौंदर्यप्रसाधनांचा वापर केल्यामुळे त्यांचे नुकसान होऊ शकते. खरं तर पापण्यांना फार स्वच्छतेची गरज नसते व पापण्यांवर फेस स्क्रब तर मुळीच वापरू नयेत.

तसेच चेहऱ्यासाठी वापरण्यात येणारे फेस स्क्रब डोळ्यांच्या पापण्यांसाठी योग्य नसतात. कारण ते पापण्यांच्या त्वचेसाठी त्रासदायक ठरू शकतात. मात्र जर तुमच्या भुवयांच्या केसांमध्ये कोंडा असणे किंवा तुम्हाला पापण्यांजवळील त्वचा कोरडी असण्याची समस्या असेल तर तुम्ही अगदी सौम्य स्क्रब वापरू शकता. यासाठी अति दाणेदार अथवा खरखरीत नसलेले एखादे सौम्य ॲप्रिकॉट स्क्रब तुम्ही घेऊ शकता. या स्क्रबचा काही भाग घ्या व त्यामध्ये थोडे मॉश्चरायझर मिसळून तुम्ही त्याचा हलक्या हाताने तुमच्या पापण्यांवर मसाज करू शकता. हा मसाज करताना एक गोष्ट नेहमी लक्षात ठेवा हा मसाज क्लॉकवाइज करावा.



जर तुमच्या पापण्यांवरील केस पातळ व कमजोर असतील तर मात्र तुमच्या डोळ्यांच्या आजूबाजूला कोणतेही सौंदर्यप्रसाधने वापरू नका. जर तुमच्या पापण्यांवरील केस दाट असतील व तुम्हाला कोरड्या त्वचेची समस्या असेल तर तुम्ही वर दिलेले मिश्रण वापरू शकता. डोळ्यांच्या पापण्यांवर कोरफडाचे जेल अथवा मास्क वापरणे योग्य ठरेल.

# सकाळची न्याहारी किती आवश्यक आहे!

**सकाळची** न्याहारी शरीरासाठी किती आवश्यक आहे, हे सर्वजण जाणत असूनही अनेक लोक सकाळच्या नाश्त्याकडे दुर्लक्ष करून घराबाहेर पडतात. त्याचे दुष्परिणाम मग त्यांच्या शरीरावर होतात.

सकाळचा नाश्ता निरोगी राहण्यासाठी फार महत्त्वाचा आहे. नाश्ता शरीरात ऊर्जा निर्माण करतो. नाश्ता करणारे लोक नाश्ता न करणाऱ्या लोकांपेक्षा अधिक धडधाकट असतात. सकाळी उठल्यानंतर एक तासात नाश्ता करायला हवा. नाश्ता केल्याने मेंदूला चालना मिळते व एकाग्रता वाढायलाही मदत होते. शाळा-कॉलेजांत जाणारी बरीचशी मुले जी नाश्ता करत नाही, त्यांचे लक्ष अभ्यासात केंद्रित होत नाही. पण समतोल नाश्ता घेतला तर अनेक आजारांपासून आपला बचाव होऊ शकतो.



सकाळच्या नाश्त्यात प्रथिने, खनिज, व्हिटॅमिन, फायबर, कार्बोहायड्रेट इत्यादी घटकांचा समावेश करा. नाश्त्यामध्ये भाज्या, फळं, दूध, मोड आलेले कडधान्य, पनीर, दही, सालीच्या डाळी इत्यादींचा समावेश करा. तसेच संमिश्र भाज्या मिळवलेले पोहे, ओट्स, उपमा, दालिया, चिलाल चपाती, इडली, उकडलेले अंडे इत्यादी घेऊ शकता.

सकाळचा नाश्ता केल्यास हृदयरोग, अल्सर, मधुमेह, लठ्ठपणा यासारख्या आजारापासून बचाव होऊ शकतो.

# आपल्याला होते फूड ॲलर्जी, तर हे करा

**जेव्हाही** आपले शरीर खाण्याप्रती अधिक क्रियाशील होते तेव्हा फूड ॲलर्जीची तक्रार होऊ शकते. अशात काही प्रोटीनयुक्त आहारदेखील आपल्या शरीराला नुकसान करू शकतात कारण काही लोकांची प्रतिकारशक्ती काही पदार्थांना प्रतिसाद देऊ शकत नाही आणि त्याचे दुष्परिणाम म्हणून ॲलर्जी दिसून येते. मुख्यतः लोकांना मैदा, सोया, अंडी, मासे, शेंगदाणे, काही विशिष्ट मसाले किंवा एखाद्या तेलाच्या प्रकारची ॲलर्जी असते. कधी कधी ॲलर्जी टेस्ट मध्येही ॲलर्जी नेमकी कसली आहे हे कळून येत नाही. अशात ते आपल्यालाच शोधून काढायला हवे. एकदा ॲलर्जी कोणत्या पदार्थाची आहे समजल्यावर पथ्ये पाळणे आवश्यक असतं.

**सामान्यतः ॲलर्जीची ही लक्षणे असतात** ▮खाज सुटणे ▮अतिसार ▮डोळे, ओठ आणि चेहऱ्यावर सूज येणे ▮श्वास घ्यायला त्रास होणे ▮हृदयाच्या ठोक्यांची गती वाढणे

**यापासून वाचण्यासाठी**

▮जर आपल्या खाण्यामुळे त्रास होत असेल तर खाण्याशी संबंधित सर्व धान्य टाळावे. ▮बाहेर आहार घेताना विशेष काळजी घ्यावी.

# लंचनंतर अजिबात नका करू हे काम

**ब्रश करणे :** लंचनंतर ब्रश करणे योग्य नाही. कारण आपण सिट्स असलेला आहार घेतला असल्यास ब्रश केल्याने दातांवरील ती परत निघून जाते ज्याला इनेमल असे म्हणतात.



**अधिक पाणी पिणे :** आपण जेवल्यानंतर अधिक मात्रेत पाणी पित असल्यास पाचक प्रणालीवर याचा गंभीर प्रभाव होतो. यामुळे अनेक रोग उद्भवण्याची शक्यता असते. खरं म्हणजे जेवताना आणि जेवण झाल्यावर लगेच पाणी पिणे विष समजले जाते. जेवण झाल्यावर कमीत कमी अर्धा किंवा तासाभरानंतर पाणी पिणे योग्य आहे.

**फिरणे :** काय आपण ही लंच घेतल्यानंतर फेऱ्या मारता? पण ही एक हानीकारक सवय आहे जी लगेच थांबवायला हवी. तज्ज्ञांप्रमाणे आमची पाचक प्रणाली इतकी मजबूत आहे की लंचमध्ये आपण कितीही अटरम- शटरम खाल्लं असेल तरी सर्वकाही पचून जातं. या दरम्यान आमची प्रणाली आहाराला पचवून सर्व आवश्यक पोषण आम्हाला ऊर्जेच्या रूपात देतं. पण आमचे हे सिस्टम जरा संवेदनशील असल्यामुळे तेव्हा त्याला आपले कार्य सुरळीतरीत्या पार पडण्यात अडथळा निर्माण होतो जेव्हा आपण त्याला यातना देतात. म्हणून दुपारी लंच केल्यानंतर फिरणे किंवा काही हेवी कार्य करण्याऐवजी १५ ते २० मिनिटे आराम करण्याचा सल्ला दिला जातो.

**ड्रायव्हिंग :** जेवण पचवण्यासाठी अधिक रक्ताची गरज असते, ज्यासाठी मेंदू मदत करतं. परंतु जेवल्यानंतर आपण ड्रायव्हिंग करत असाल तर मेंदू त्यावर आपलं लक्ष केंद्रित करतो आणि जेवण पचवण्यात त्याची मदत मिळत नाही.

**झोपणे :** लंचनंतर लगेच झोपल्याने पचन संबंधी रोग होऊ शकतात. याने आपल्या गॅससंबंधी समस्याही उद्भवू शकते.

# फोनचे ब्लूटूथ नेहमी ऑन असते?
## मिनिटात होऊ शकते डिव्हाइस हॅक, असे राहा सेफ

जर तुम्ही तुमच्या फोनमध्ये नेहमी ब्लूटूथ चालू ठेवत असाल तर, सावध व्हा. कारण, यामुळे तुमचा फोन हॅक देखील होऊ शकतो. जाणून घेऊया याबद्दल सविस्तर. ब्लूटूथ सर्व फोनमध्ये असते आणि बरेच लोक ते सतत वापरतात सुद्धा. स्मार्टफोन, टॅबलेट आणि लॅपटॉपमध्ये ब्लूटूथ आधीच दिलेले आहे. एका डिव्हाइसवरून दुसऱ्या डिव्हाइसमध्ये फाइल ट्रान्सफर करण्यासाठी ब्लूटूथची आवश्यकता असते. पण तुम्हाला माहीत आहे का ? डिव्हाइसमध्ये असलेले ब्लूटूथ जितके सोयीस्कर आहे तितकेच ते धोकादायकसुद्धा असू शकते. हॅकर्स ब्लूटूथद्वारे तुमचे डिव्हाइस हॅक करू शकतात. त्याला ब्लूबगिंग असेही म्हणतात. ब्लूटूथ हॅकिंग कसे केले जाते आणि त्यापासून तुम्ही कसे सुरक्षित राहू शकता, याबद्दल ही महत्त्वाची माहिती.

**ब्लूटूथ हॅकिंग कसे काम करते?**

हॅकर्स एक विशिष्ट सॉफ्टवेअर वापरतात, जे आपोआप ब्लूटूथने सुसज्ज असलेली उपकरणे शोधतात. हॅकर्स हेदेखील पाहू शकतात की, तुमचे डिव्हाइस आधी कोणत्या नेटवर्कशी कनेक्ट केले गेले आहे. फोन आधीपासून कनेक्ट केलेले नेटवर्क पुरेसे विश्वासार्ह मानतो आणि भविष्यात त्यांच्याशी आपोआप कनेक्ट होतो. सायबर गुन्हेगारांना तुमच्या डिव्हाइसचे विश्वसनीय नेटवर्क माहीत असल्यास, ते त्याद्वारे तुमच्या डिव्हाइसशी कनेक्ट होतात. यानंतर तुमचे डिव्हाइस हॅक होते. त्यानंतर हॅकर्स डिव्हाइसमध्ये मालवेअर इन्स्टॉल करतात. याद्वारे हॅकर्स तुमची हेरगिरी करतात. तुमचे मेसेजेस वाचतात आणि डेटा देखील चोरू शकतात.



**यापासून सुरक्षित कसे राहायचे?**

डिव्हाइस वापरात नसताना ब्लूटूथ डिसेबल करा. तुम्हाला फाइल्स ट्रान्सफर करायच्या असतील तर, तुम्ही एयर ड्रॉप किंवा फास्ट शेयर वापरू शकता. ब्लूटूथ सेवांची प्रवेशक्षमता मर्यादित करा. हे ब्लूबगिंग टाळते. तुमच्या स्मार्टफोन, टॅबलेट आणि ब्लूटूथ सक्षम संगणकांवर तुमच्याकडे अँटीमालवेअर ॲप स्थापित असल्याची खात्री करा. एखाद्या हॅकरने तुमच्या डिव्हाइसमध्ये शिरण्याचा प्रयत्न केल्यास, अँटी-मालवेअर ॲप तुमची गोपनीयता आणि वैयक्तिक डेटा संरक्षित करताना संशयास्पद ॲक्टीव्हीटीज शोधू आणि ब्लॉक करू शकतो.

# वजन घटवण्यासाठी 'पीनट बटर' उपयुक्त

**सँडविचमध्ये** लावण्यासाठी एक अतिशय पौष्टिक 'स्प्रेड' म्हणून 'पीनट बटर' म्हणजेच शेंगदाण्यांपासून तयार केले गेलेले बटर अतिशय लोकप्रिय होऊ लागले आहे. अतिशय पौष्टिक तत्त्वांनी परिपूर्ण असे पीनट बटर वजन घटवण्यासाठीही उपयुक्त असल्याचे आहारतज्ज्ञ म्हणतात. पीनट बटरमध्ये असणारी प्रथिने, जीवनसत्त्वे आणि क्षार वजन घटवण्यास सहाय्यक आहेत. पीनट बटरच्या सेवनाने भूक लवकर शमत असून, त्यामुळे अन्नाचे सेवन आपोआपच कमी होते. याच्या सेवनाने शरीराची चयापचय शक्ती वाढत असून, त्यामुळेही वजन घटण्यास मदत होते. पीनट बटर पोळीबरोबर, भाकरीबरोबर किंवा गव्हापासून तयार केलेल्या ब्रेडसोबत खाता येऊ शकते. फळे किंवा कच्च्या भाज्यांच्या कापांच्या सोबतही हे बटर खाता येते. सकाळच्या नाश्त्यामध्ये ओटमिल घेत असल्यास किंवा दह्यामध्ये मिसळूनही पीनट बटरचे सेवन करता येते. मात्र वजन घटवताना पीनट बटर आहारामध्ये समाविष्ट करताना त्यामध्ये इतर 'ॲडीटिव्ह' असणार नाहीत याची काळजी घेणे आवश्यक आहे. पीनट बटर बाजारातून आणण्यापेक्षा घरी तयार करणे अधिक चांगले. हे बटर बनवण्यासाठी शेंगदाणे भाजून घ्यावेत आणि त्यांची साले काढून घ्यावीत. त्यानंतर शेंगदाणे मिक्सरमध्ये घालून थोडेसे शेंगदाण्याचे तेल घालावे, त्यानंतर मिक्सर सुरू करून शेंगदाणे तीन ते चार मिनिटे मिक्सरवर वाटावेत. तयार झालेल्या शेंगदाण्याच्या पेस्टला पीनट बटर म्हटले जाते. यामध्ये चवीला थोडेसे मीठ घालावे. तसेच आवडत असल्यास किंचित मध आणि दालचिनीची पूडही यामध्ये घालता येऊ शकते.



# चेहरा उजळण्यासाठी कांदा आणि लसणाचा फेसपॅक

**सुंदर, नितळ, गोरी त्वचा कोणाला नको असते. यासाठी लोक चेहऱ्यावर विविध प्रयोग करत असतात. मात्र कांदा आणि लसूणचा फेसपॅक तुम्ही कधी ट्राय केलाय का?**





**त्वचा उजळण्यासाठी लसूण फायदेशीर :** लसूणमध्ये व्हिटॅमिन सी, व्हिटॅमिन बी६, सेलेनियम, झिंक असते. त्वचेवरील मुरुमे हटवण्यासाठी लसूण फायदेशीर आहे. लसणाच्या पेस्टमध्ये मध मिसळून हा पॅक लावल्यास चेहऱ्यास फायदा होता. पिंपल्सच्या जागी लसूणचा रस लावा, पिंपल्स लवकर बरे होतील आणि डाग राहणार नाहीत.

**त्वचेसाठी वरदान आहे कांदा :** कांद्यामध्ये अनेक व्हिटॅमिन असतात. याशिवाय अँटीऑक्सिडंट्सही असतात. कांद्याच्या रसात अँटी सेप्टिक, अँटी-बॅक्टेरियल यासारखे गुण असतात. ज्यामुळे त्वचेवरील मुरुमे निघून जातात.

**कसा करावा वापर :** तुम्ही रोजच्या डाएटमध्ये कच्च्या कांद्याचा वापर करू शकता. कांदा त्वचेसाठी चांगला. याशिवाय तुम्ही कांदा किसून त्याचा फेसपॅक बनवून वापरू शकता. तसेच कांद्याच्या रसाचाही वापर करू शकता.

# घरगुती लिपस्टिक तयार करणे इतके सोपे

**बाजारात** मिळणारे कॉस्मेटिक महाग तर असतातच पण आपल्या स्कीनवर विपरित परिणाम करणारे असतात. त्यातून ओठ हे तर सर्वात नाजूक असतात, यावर रोज बाजारातील लिपस्टिक लावली तर ओठ काळे पडू लागतात. म्हणून येथे आम्ही सोपी पद्धत सांगत आहोत ज्याने आपण घरी लिपस्टिक तयार करू शकता.



**साहित्य :** एक बीट, १/२ कोकोनट ऑइल, १/२ चमचा मधमाश्यांचे मेण, १/२ चमचा कोको बटर

**कृती :** बिटाचे पातळ काप करून वाळू द्या. डिहायड्रेटरमध्ये हे काप १२० डिग्रीवर ८ तास ठेवून वाळवू शकता. नंतर मिक्सरमधून वाटून पावडर तयार करा. मंद आचेवर एका भांड्यात अर्धा ते १ कप पाणी टाकून त्यात मेण, कोकोबटर, कोकोनट ऑइल आणि बीट पावडर मिसळा. चांगले ढवळा. गडद रंगासाठी अधिक पावडर किंवा वाळलेल्या चेरीज वापरू शकता. घट्ट झाल्यावर मऊ कपड्याने गाळून घ्या. लिप कंटेनरमध्ये हे मिश्रण ओतून घ्या. थंड होऊ द्या. आपले लिपस्टिक तयार झाले. हे पूर्णपणे नैसर्गिक असल्यामुळे ओठ काळे पडणार नाहीत.

# 'ब्लॅक टी'चे असेही फायदे

**ब्लॅक** टीमुळे शरीरातील टॉक्सिंस, विषारी घटक बाहेर निघण्यास मदत होते. भारतात सर्वाधिक प्यायले जाणारे पेय म्हणून चहाचा पहिला क्रमांक लागतो. चहा, कॉफी म्हटले की अनेक जण दुधाचा चहा, कॉफीला पसंती देतात. दुधाच्या चहाच्या तुलनेत खूप कमी लोकांना ब्लॅक टी आवडते. तुलनेने ब्लॅक टी चवीला चांगली लागत नसली तरी तिचे अनेक फायदे आहेत. बाजारात अनेक प्रकारच्या ब्लॅक टी उपलब्ध आहेत. घरात बनवली जाणरी ब्लॅक टी लिंबू रस टाकून घेता येते. बाजारात इंग्लिश ब्रेकफास्ट टी, अर्ल ग्रे टी, आसाम टी, दार्जिलिंग टी, निलगिरी टी असे चहाचे अनेक प्रकार उपलब्ध आहेत.



काही दिवसांपूर्वी अमेरिकेतील कॅलिफोर्निया युनिव्हर्सिटीत एक संशोधन करण्यात आले होते. या संशोधनाचा अहवाल युरोपियन जर्नल ऑफ न्यूट्रिशनमध्ये पब्लिश करण्यात आला होता. या अभ्यासानुसार ब्लॅक टीमध्ये विविध प्रकारचे विशेष तत्त्व असल्याचे सिद्ध झाले आहे. ब्लॅक टीमधील चहाचे विशेष तत्त्व पोटात जाऊन मोठा प्रभाव पाडतात. ब्लॅक टीमुळे वजन घटवण्यास मदत होते. तसंच शरीरातील टॉक्सिंस, विषारी घटक बाहेर निघण्यास मदत होते. विषारी द्रव्ये शरीरातून बाहेर निघाल्यामुळे कोणताही आजार बळावण्याची शक्यता कमी होते. टॉक्सिंस शरीरातून बाहेर पडल्यामुळे आरोग्यही उत्तम राहण्यास मदत होते.

चहात ॲण्टी ऑक्सिडेंट सर्वाधिक असतात. अनेक संशोधनांतून संशोधकांनी ब्लॅक टी आणि ग्रीन टीमध्ये प्रोबायोटिक्स तत्त्व आढळून येत असल्याचे सांगितले आहे. प्रोबायोटिक्स तत्त्व शरीरात प्रतिरोधक सूक्ष्मजीवांच्या वाढीसाठी मदत करतात. ब्लॅक टी वजन नियंत्रणात ठेवून अनेक आजारांपासून बचावही करते.



ब्लॅक टीमध्ये दूध आणि साखर नसल्याने शरीरात फॅट जमा होत नाही. चहातील ॲण्टीऑक्सिडेंट शरीरातील अतिरिक्त चरबी न वाढू देण्याचे काम करते. एका संशोधनातून दिवसांतून तीन वेळा ब्लॅक टी पिण्यामुळे रक्तदाब नियंत्रणात राहत असल्याचे समोर आले आहे. डोकेदुखी होत असल्यास ब्लॅक टीमध्ये लिंबू टाकून प्यायल्याने डोकेदुखीत आराम मिळतो.

# इंटरनेटवरील नको त्या गोष्टींपासून मुलांना असे ठेवा दूर

**आजच्या** डिजिटल जगात, इंटरनेटचा वापर थोरा-मोठ्यापासून ते लहान मुलापर्यंत प्रत्येक व्यक्ती करतो. लहान मुलांना इंटरनेटवर सहसा ऑनलाइन व्हिडीओ किंवा त्यांच्या वयोगटाशी संबंधित कार्टून इत्यादी यूट्यूबवर पाहायला आवडते. मात्र इंटरनेटवर अनेक प्रकारचे कंटेंट उपलब्ध असतात. ज्यामुळे मुले भरकटू शकतात. असे होऊ नये याकरिता मुलांच्या इंटरनेट ॲक्टिव्हिटीवर लक्ष ठेवणे आणि त्यासाठी सुरक्षित पद्धतींचा अवलंब करणे अत्यंत आवश्यक आहे. तुम्हालाही तुमच्या मुलांचा इंटरनेट वापर सुरक्षित ठेवायचा असेल तर, ही माहिती तुमच्यासाठी. यामध्ये आज आम्ही चुकीच्या कंटेंटपासून



मुलांचे संरक्षण करण्याच्या काही सोप्या टिप्स सांगणार आहोत. जाणून घेऊया.

**पॅरेंट्स कंट्रोल्स वापरा :**

आजकाल गुगलसह यूट्यूब आणि इंस्टाग्रामसारख्या अनेक प्लॅटफॉर्मवर पॅरेंट्स कंट्रोल सुविधादेखील उपलब्ध आहे. तुमची मुले नियमितपणे वापरत असलेले ॲप्स नियंत्रित करण्यासाठी तुम्ही याचा वापर करू शकता.

**मुलांना इंटरनेट सुरक्षिततेबद्दल शिकवा**


हे सर्वात महत्त्वाचे काम आहे. कारण मुलांच्या ॲक्टिव्हिटीवर लक्ष ठेवणे सोपे काम नाही. अशात, मुलांना इंटरनेटवरील धोक्यांची माहिती देणे आणि त्यांना इंटरनेट वापरण्याच्या योग्य मार्गांची जाणीव करून देणे आवश्यक आहे. यासोबतच मुलांना ऑनलाइन पेमेंट आणि मालवेअरच्या धोक्यांबाबत आवश्यक माहिती दिली पाहिजे.

**स्वतंत्र ई-मेल आयडी तयार करा :**

तुम्ही मुलांसाठी वेगळा ई-मेल आयडी देखील तयार करू शकता, त्यामुळे वेब ब्राऊझिंग दरम्यान अनावश्यक जाहिराती टाळता येतील. यासोबतच तुमची मुलं कोणत्या प्रकारचा कंटेन्ट पाहत आहे याची अचूक माहितीही तुम्हाला मिळेल. त्याच वेळी, नवीन ई-मेल आयडीवरून ब्राऊझरच्या मदतीने तुम्ही असुरक्षित वेबसाइट आणि कुकीज बंद करू शकता.

# स्मरणशक्ती वाढवण्यासाठी 'हाकिनी योगमुद्रा' उपयुक्त

**नववर्षाचा** उल्लास आता सरला आहे आणि विद्यार्थी वर्गाला आता वेध लागले आहेत ते लवकरच येणार असलेल्या वार्षिक परीक्षांचे. सर्वसाधारणपणे मार्च ते एप्रिल महिन्यांच्या दरम्यान होणार असलेल्या या परीक्षांची तयारी, विद्यार्थी आतापासून करण्यास सुरुवात करीत असतात. पालकही या काळामध्ये मुलांच्या खाण्या-पिण्याची, त्याच्या तब्येतीची काळजी घेण्यामध्ये कोणतीही कसर बाकी ठेवत नाहीत. या काळामध्ये मुलांची स्मरणशक्ती चांगली राहावी याकरिता योग्य आहार, नियमित आणि पुरेशी झोप मुलांना मिळणे आवश्यक असते. यामुळे शारीरिक आणि मानसिक तणाव दूर होण्यास मदत होते. मुलांची स्मरणशक्ती चांगली राहावी, याकरिता योगसाधनेची मदतदेखील घेता येऊ शकेल. मेंदू सक्रिय राहून स्मरणशक्ती चांगली राहावी याकरिता योगसाधनेमध्ये हाकिनी मुद्रा सांगितली गेली आहे.



एखाद्या गोष्टीचा विसर पडत असल्यास ही मुद्रा लावून त्या वस्तूचे स्मरण करण्याचा प्रयत्न केल्याने ती गोष्ट आठवण्याची शक्यता मोठी असते. विद्यार्थ्यांच्याखेरीज ज्यांना वारंवार काही ना काही गोष्टी विसरण्याची सवय असते, त्यांच्यासाठी देखील ही मुद्रा लाभदायी आहे. ही मुद्रा करण्यासाठी दोन्ही हातांच्या पाचही बोटांचे अग्रभाग जुळवावे. त्यानंतर डोळे वरच्या बाजूला फिरवून त्यांवर अगदी हलका ताण द्यावा. श्वास घेत आपली जीभ हिरड्यांना टेकवावी. त्यानंतर श्वास सोडत जीभ पूर्वस्थितीत आणावी. ही मुद्रा करताना श्वासोच्छ्वास दीर्घ असावा. विद्यार्थ्यांकरिता स्मरणशक्ती वाढवण्याच्या दृष्टीने ही मुद्रा अतिशय लाभदायक आहे.

# भिवंडी अग्निशमन यंत्रणेवर ताण

## मनुष्यबळाअभावी गोदामातील आगींवर नियंत्रण मिळवताना कर्मचाऱ्यांची दमछाक

**■भिवंडी :** १४ लाख लोकसंख्या असलेला भिवंडी तालुका ज्यामध्ये भिवंडी शहरातील सुमारे १० लाख लोकसंख्या याचा विचार केल्यास भिवंडी शहर व ग्रामीण भागातील गोदाम भागासाठी स्वतंत्र अग्निशमन यंत्रणेची गरज आहे. पण भिवंडी शहर, ग्रामीणसह आसपासच्या ग्रामीण भागातील आगींच्या वर्दीवर जाण्याची जबाबदारी भिवंडी अग्निशमन यंत्रणेवर येत आहे. पण मागील कित्येक वर्षात भिवंडी अग्निशमन दलात नोकर भरती न झाल्याने अपुऱ्या मनुष्यबळाच्या जोरावर तारेवरची कसरत अग्निशमन दलाला करावी लागत आहे.

**तब्बल ३२ वाहनांचा समावेश**

पालिकेच्या अग्निशमन विभागाच्या दिमतीला फायर वॉटर टॉवर १, फायर इंजिन ८, मल्टीपरपझ फायर इंजिन (फोम टेंडर) ५, वॉटर ब्राउझर ५, मिनी फायर इंजिन ७, फायर अँड रेस्क्यू व्हॅन (देवदुत व गुरखा) २, फायर जीप १, फायर बाईक ३ अशी तब्बल ३२ वाहने आहेत. या आकडेवारीवरून हेच सिद्ध होते की,भिवंडी पालिका अग्निशमन दलाकडे यंत्रणा आहे, पण चालवणार कोण? हा प्रश्न उपस्थित होत आहे. विशेष म्हणजे आज ही फायर बाईक एक वर्षापासून वापराविना पडून आहे.



आगीच्या घटना व दुर्घटना काळात सर्वात प्रथम धावून जावे लागते ते अग्निशमन यंत्रणेला. भिवंडी शहर असो अथवा तालुक्याच्या ग्रामीण भागातील गोदामांमध्ये आगीच्या घटना सतत घडत असतात. अशावेळी होणारी वित्त व जीवितहानी टाळण्यासाठी भिवंडी पालिकेचा अग्निशमन दलातील जवान नेहमीच एक पाऊल पुढे असतो. मात्र भिवंडी पालिकेकडे यंत्र सामुग्री व वाहन सामुग्री पुरेशी आहे. पण नोकरभरती रखडल्याने मनुष्यबळाअभावी अग्निशमन दलावर अतिरिक्त ताण येत असल्याचे प्रकषार्ने जाणवते.

भिवंडी अग्निशमन दलात मागील काही वर्षात अत्याधुनिक यंत्रणेंसह वाहन दाखल झाली. पण त्याचा वापर करणारे पुरेसे मनुष्यबळ पालिकेच्या हाती नाही. शासन मान्यतेनुसार पालिका सेवेत मुख्य अग्निशामक अधिकारी, उपमुख्य अग्निशामक अधिकारी ही दोन्ही पदे रिक्त असल्याने प्रभारी भार अधिकाऱ्यांवर सोपवला आहे.

दरम्यान भिवंडी शहरासोबत ग्रामीण भागातील गोदाम पट्ट्यांमधील आगी लागण्याच्या घटनांवेळी अग्निशमन दलाची खरी कसरत होत असते. २०२२ ते २०२४ या मागील तीन वर्षांचा आलेख पाहिल्यास शहरात ४४० तर ग्रामीण भागात याच काळात ३०५ आगीच्या घटना घडल्या. तर या तीन वर्षांच्या काळात शहरात ४७४ तर ग्रामीण भागात १०७ रेस्क्यू वर्दी केल्या आहेत.

**एमएमआरडीएचे दुर्लक्ष**

सुमारे ५० हजार हून अधिक गोदामे आहेत. या ग्रामीण भागाच्या विकासाची जबाबदारी शासनाने २००९ पासून एमएमआरडीए प्राधिकरणाकडे सोपविली आहे. परंतु या १५ वर्षांच्या काळात या भागात विकास शुल्क म्हणून कोट्यावधी रुपये जमा करणाऱ्या एमएमआरडीए प्रशासनाने या भागात अग्निशमन केंद्र उभारण्यात कधीच पुढाकार घेतला नाही.

**ही यंत्रणा कोलमडलेलीच**

२०२१ मध्ये तत्कालीन खासदार कपिल पाटील यांनी याबाबत केलेल्या पत्रव्यवहारास उत्तर देताना एमएमआरडीएकडून ११ मे २०२१ रोजी या भागात स्वतंत्र अग्निशामक केंद्र उभारणीस प्राधिकरणाच्या ७ जुलै २०२० रोजीच्या बैठक क्रमांक १४९ व्या बैठकीत मंजुरी दिली असून, अग्निशमन दलासाठी अधिकारी कर्मचारी यांच्या नियुक्तीची प्रक्रिया सुरू असल्याचे कळवले.

# लाचप्रकरणी केडीएमसीतील ३ अधिकाऱ्यांना अटक

## ४७ जणांना लाचलुचपत विभागाचा हिसका



**■डोंबिवली :** कल्याण -डोंबिवली मनपातील (केडीएमसी) तीन अधिकाऱ्यांना लाच घेताना रंगेहात पकडण्यात आले असून, लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने कारवाई करत त्यांना अटक केली आहे. या प्रकारामुळे पालिकेत खळबळ उडाली आहे. केडीएमसीच्या घनकचरा विभागाचे अधिकारी वसंत देवळूरकर आणि सुदर्शन जाधव यांनी आजारी कर्मचाऱ्याला पुन्हा कामावर घेण्यासाठी २५ हजार रुपयांची लाच मागितली होती. ठाणे लाचलुचपत विभागाने सापळा रचत, २५ जुलै रोजी त्यांना २० हजारांची लाच स्वीकारताना रंगेहात पकडले.

दरम्यान, केडीएमसीचे सहाय्यक अभियंता रवींद्र आहिरे याला देखील बांधकाम परवानगी देण्यासाठी एका बांधकाम व्यावसायिकाकडून ४० हजारांची लाच घेताना अटक करण्यात आली आहे. या ताज्या कारवाईनंतर केडीएमसीमधील लाचखोरीच्या प्रकरणांचा आकडा ४७ वर पोहोचला आहे. याआधीही अनेक अधिकारी आणि कर्मचारी लाच घेताना पकडले गेले असून, प्रशासनातील भ्रष्टाचाराचे प्रकार दिवसेंदिवस समोर येत आहेत. णे लाचलुचपत विभागाकडून या तिघांविरोधात पुढील कायदेशीर कारवाई सुरू असून, अधिकाऱ्यांच्या वरच्या पातळीपर्यंत चौकशी होण्याची शक्यता आहे. यापुढील कारवायांमुळे आणखी काही नावं बाहेर येण्याची शक्यता प्रशासनातून वर्तवली जात आहे.

# धोकादायक इमारतीवर महापालिकेची तोडक कारवाई

**■भाईंदर :** मिरा-भाईंदर महापालिकेच्या प्रभाग समिती ३ मधील बी.पी. रोड, शितल शॉपिंग सेंटरजवळील द्वारका धाम या धोकादायक इमारतीवर महापालिकेकडून तोडक कारवाई सुरू करण्यात आली आहे. भाईंदर पूर्वेच्या बी. पी. रोड, शितल शॉपिंग सेंटरजवळील द्वारका धाम या इमारतीची स्थिती अत्यंत जीर्ण आणि अस्थिर झाल्यामुळे परिसरातील नागरिकांच्या जिवितास धोका निर्माण झाला होता. त्यामुळे सार्वजनिक सुरक्षेच्या दृष्टीने ही कारवाई करणे अत्यावश्यक होते. महापालिकेच्या अतिक्रमण विभागाच्या अहवालानुसार द्वारका धाम इमारत धोकादायक घोषित करण्यात आली होती. महापालिकेच्या अतिक्रमण विभाग, स्थानिक प्रभाग कार्यालय आणि पोलीस प्रशासन यांच्या सहकायार्ने या इमारतीवर तोडक कारवाई करण्यात आली. मंगळवारी सकाळी ८ वाजता या इमारतीवर तोडक कारवाईला सुरूवात करण्यात आली. खबरदारी म्हणून त्याआधी शेजारील इमारत रिक्त करण्यात आली.



या कारवाईत परिसरात योग्य सुरक्षा व्यवस्था तैनात करण्यात आली होती. तसेच सुरळीत असलेल्या वाहतुकीला या कारवाई दरम्यान काही अडथळा होऊ नये म्हणून पयार्यी मार्ग उपलब्ध करुन देण्यात आला. महापालिकेने स्थानिक नागरिकांना पूर्वसूचना देणे आणि इमारतीच्या आसपास योग्य प्रतिबंधक उपाययोजना केल्यामुळे या कारवाई दरम्यान कोणतीही दुर्घटना घडली नाही. शहरातील नागरिकांनी अशा धोकादायक इमारतीत वास्तव्य टाळावे, तसेच महापालिकेच्या सूचना व आदेश यांचे पालन करावे असे आवाहन आयुक्त तथा प्रशासक राधाबिनोद शर्मा यांनी केले आहे. या कारवाईवेळी अतिरिक्त आयुक्त प्रियांका राजपूत यांच्या मार्गदर्शनाखाली उपायुक्त(मुख्यालय) कल्पिता पिंपळे, अतिक्रमण विभागप्रमुख नरेंद्र चव्हाण, सहाय्यक आयुक्त दत्तात्रय वरकुटे, उपअभियंता सतीश तांडेल, अतिक्रमण कर्मचारी तसेच प्रभाग क्रमांक १ ते ६ मधील फेरीवाले पथक आणि महाराष्ट्र सुरक्षा बलाचे जवान उपस्थित होते.




# राज्यातील प्रतिष्ठित विद्यापीठात मोठा आर्थिक घोटाळा

**■रायगड :** रायगड जिल्ह्यातील लोणेरे येथे असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रविद्यानिकेत विद्यापीठात एक धक्कादायक आर्थिक घोटाळा उघडकीस आला आहे. विद्यापीठात ठेकेदार पद्धतीने काम करणाऱ्या एका लिपिकाने १२८ विद्यार्थ्यांची फसवणूक करून तब्बल १६ लाखांहून अधिक रकमेचा अपहार केल्याचे समोर आले आहे. सुमित अनिल जाधव असे अटक करण्यात आलेल्या लिपिकाचे नाव आहे. या घटनेने शैक्षणिक वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.

**नेमकं काय घडलं?**

रायगडच्या लोणेरे या ठिकाणी डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रविद्यानिकेतन येथे ठेकेदार पद्धतीने काम करणाऱ्या एका लिपिकाने १२८ विद्यार्थ्यांची फसवणूक केली आहे. या लिपिकाने तब्बल १६.३८ लाख रुपयांचा अपहार केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. सुमित अनिल जाधव असे अटक करण्यात आलेल्या लिपिकाचे नाव आहे. या घटनेने शैक्षणिक वतुळार्त मोठी खळबळ उडाली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सुमित अनिल जाधव सह्याद्री वसतिगृहात कंत्राटी लिपिक म्हणून कार्यरत होता. त्याने विद्यार्थ्यांकडून त्यांच्या शिष्यवृत्ती, फी आणि इतर विविध खर्चांच्या नावाखाली स्वतःच्या 'जीपे' खात्यावर सुमारे १५ लाख ७८ हजार ५०० रुपये जमा करून घेतले. यासाठी त्याने विद्यार्थ्यांची दिशाभूल केली. तसेच त्यांना काही ठिकाणी धमकीही दिली, असे तक्रारीत नमूद करण्यात आले.

याशिवाय, सुमित जाधवने विद्यापीठाच्या अधिकृत चेकशी (क्रमांक ८२१८७६) छेडछाड करून अतिरिक्त ६० हजार रुपयांचा अपहार केल्याचेही पोलीस तपासात स्पष्ट झाले आहे. मूळ चेकवर ६८९० रुपये नमूद असताना, त्याने त्यात फेरफार करून ६६,८९० रुपये स्वतःच्या खात्यात वळते केले. अशाप्रकारे त्याने एकूण १६ लाख ३८ हजार ५०० रुपयांची फसवणूक केली.

**विद्यापीठातील प्रशासकीय कामकाजावर प्रश्नचिन्ह**

याप्रकरणी गुजरातमधील सुरत या ठिकाणी राहणारे प्रतिककुमार पुरानी या उअ ने याबद्दल तक्रार केली आहे. या प्रकरणी त्यांनी १७ जुलै २०२५ रोजी रात्री ९:४६ वाजता गोरेगाव पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. ही तक्रार दाखल झाल्यानंतर अवघ्या दोन तासांत रात्री ११.३९ वाजता आरोपी सुमित अनिल जाधव याला अटक करण्यात आली. त्याच्यावर भारतीय दंड संहिता कलम ३२६(५), ३१८(२), ३१८(४), ३३८(२), ३५१(२) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी आरोपीला २१ जुलैपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली होती. त्यानंतर त्याची न्यायालयीन कोठडीत रवानगी करण्यात आली आहे. या मोठ्या आर्थिक घोटाळ्यामुळे विद्यापीठातील प्रशासकीय कामकाजावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

# मुलींच्या घोळक्यात घुसली भरधाव कार, एकीचा मृत्यू तर ३ जण गंभीर जखमी

**■कोल्हापुर :** कोल्हापुरात एक धक्कादायक घटना घडली आहे. एका भरधाव चारचाकीनं महाविद्यालयीन विद्यार्थीनींना धडक दिल्याची घटना घडली आहे. कुरुकली भोगावती कॉलेजच्या रिक्वेस्ट बस स्टँड इथं ही घटना घडली आहे. या चारचाकीच्या धडकेत एका विद्याथीर्नीचा मृत्यू झाला आहे. तर ३ विद्याथीर्नी गंभीर जखमी झाल्या आहेत. प्रज्ञा दशरथ कांबळे (वय १८) असं मृत्यू झालेल्या कौलवं येथील विद्याथीर्नीचं नाव आहे. तर जखमी झालेल्या तरुणींवर रुग्णालयात उपचार सुरु आहेत.

**दोघा अल्पवयीन तरुणांना पोलिसांनी घेतलं ताब्यात**

कॉलेज संपल्यानंतर बस स्टँडवर उभारलेल्या मुलींच्या घोळक्यात भरधाव कार घुसल्यानं हा अपघात झाला. दरम्यान, या घटनेनंतर कारचालकासह दोघा अल्पवयीन तरुणांना पोलिसांनी ताब्यात घेतलं आहे. घटनास्थळासह सीपीआर रुग्णालयासमोर नातेवाईक आणि ग्रामस्थांची मोठी गर्दी झाली होती. दरम्यान, ताब्यात घेतलेल्या चालकाची पोलिस कसून चौकशी करत आहेत. नेमका हा प्रकार घडला कसा याचीही पोलिस चौकशी करत आहेत. दरम्यान, या घटनेमुळं परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. दरम्यान, या अपघातात जखमी झालेल्या मुलींवर उपचार सुरु आहेत.





**बीडमध्ये एसटी बस आणि दुचाकीच्या अपघात पती पत्नी ठार**

अहिल्यानगर-अहमदपूर महामार्गावरील पाटोदा इथं भरधाव एसटी बसने दुचाकीस्वराला धडक दिली आहे. या अपघातात पती-पत्नी जागीच ठार झाले आहेत. बाळू वाईकर आणि लता वाईकर असे अपघातात मृत्यू झालेल्यांची नावे आहेत. हे दाम्पत्य पाटोदा तालुक्यातील भाटेवाडी गावचे रहिवासी आहेत. आठवडी बाजारासाठी पाटोदा येथे येत असताना ग्रामीण रुग्णालयासमोर एसटी बस आणि दुचाकीची धडक झाली. या अपघातात बस खाली आल्यानं या दांपत्याचा दुदैर्वी मृत्यू झाला आहे.

**हायड्रा क्रेनचा धक्का लागल्याने नवी मुंबई वाहतूक पोलिसाचा जागीच मृत्यू**

नवी मुंबई पोलिसांच हृदय पिळवटून टाकणारी एक दुःखद घटना घडली आहे. नवी मुंबईतील महापे ब्रिज खाली गणेश आत्माराम पाटील हे त्यांच्या कर्तव्यच्या हद्दीतील वाहतूक सुरळीत करत असताना हायड्रा क्रेनचा त्यांना धक्का लागला आहे. या धक्यात ते खाली पडले आणि क्रेनच चाक डोक्यावरुन गेल्याने वाहतूक कर्मचारी गणेश पाटील यांचा जागीच मृत्यू झाला. हायड्रा क्रेन चालकाला पोलिसांनी अटक केली आहे.

# तोतया टीसीवर पालघर रेल्वे पोलिसांकडून कारवाई

**■पालघर :** गुजरातहून मुंबईकडे जार्णाया मेल एक्सप्रेसमध्ये एका तोतया तिकीट चेकिंग मास्टरवर पालघर रेल्वे पोलिसांनी कारवाई केली आहे. किरण सोलंकी (राहणार, मुंबई, घाटकोपर) असे या तोतया तिकीट चेकिंग मास्टरचे नाव आहे. हा डुप्लिकेट तिकीट चेकिंग मास्टर (टीटी) गुजरातहून मुंबईकडे जार्णाया १९०१५ या सुरत- बोरीवली गाडीमध्ये बसलेल्या प्रवाशांकडे शनिवार १९ जुलै रोजी रेल्वे तिकिटांची तपासणी करत होता. यावेळी ऑन ड्युटी रेल्वेचे चेकिंग तिकीट मास्टर श्याम किरण प्रसाद यांनाही बाब लक्षात आल्यावर त्यांनी रेल्वे पोलिसांच्या मार्फत त्याला डहाणू रेल्वे स्थानकात उतरवून डहाणू रेल्वे स्थानकावर कर्तव्यावर असलेले डहाणू रेल्वे पोलीस उपनिरीक्षक अरुण कुमार शर्मा ,तिकीट चेकिंग मास्टर राहुल कुमार आणि प्रशांत यादव यांच्या ताब्यात दिले. त्यांनी त्याची कसून तपासणी करून पालघर पोलिसांच्या ताब्यात दिले. पालघर रेल्वे पोलिसांनी त्याच्यावर कारवाई केली आहे. याबाबत अधिक तपास पालघर रेल्वे लोहमार्ग पोलीस उपनिरीक्षक पळवल करत आहेत.



# कल्याण प्रकरणात मोठा ट्विस्ट! तरुणाने मारहाण करण्याआधी रिसेप्शनिस्टनेच...

**■कल्याण :** कल्याण येथे मराठी तरुणीला मारहाण प्रकरणाने राज्यात एकच खळबळ उडाली होती. परप्रांतीय तरुणाने खासगी रुग्णालयातील रिसेप्शनीस्टला लाथा-बुक्यांनी मारहाण केल्याचे प्रकरण समोर आले आहे. मात्र आता या प्रकरणात नवीन ट्विस्ट आला आहे. रिसेप्शनीस्ट तरुणीनेच पहिले आरोपीच्या वहिनीला थोबाडीत मारली असल्याचे समोर आले आहे.



दरम्यान, या घटनेनंतर रिसेप्शनीस्ट तरुणीची प्रकृती गंभीर असल्याचे समोर आले आहे. तरुणीच्या छातीला आणि पायाला मोठ्या प्रमाणात मार लागल्याचे समोर आले आहे. सध्या डॉक्टरांकडून तरुणीवर उपचार सुरू असून एक्स-रे, ब्लड आणि इतर चाचण्या करण्यात येत आहे.

कल्याण पूर्वेतील नांदिवली परिसरातील एका बाल चिकित्सालयातील मराठी रिसेप्शनिस्ट तरुणीला एका परप्रांतीय तरुणाने बेदम मारहाण केल्याची घटना सोमवारी घटली होती. गोकुळ झा असं या आरोपीचे नाव असून त्याच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. आज गोकुळ झा याला न्यायालयातदेखील हजर करण्यात आले होते. मात्र आता या प्रकरणात नवीन ट्विस्ट समोर आला आहे. या घटनेच्या आधीचा एक व्हिडिओ समोर आला आहे.

कल्याण पूर्वमध्ये एका क्लिनिकमध्ये घडलेल्या घटनेमध्ये आता नवीन वळण घेतले आहे. रिसेप्शनिस्ट मुलीला आरोपी गोकुळ झा यांनी मारायच्या आधी रिसेप्शन मुलीनेच गोकुळच्या वहिनीच्या कानशिलात लगावली होती. त्यानंतर पुन्हा दोघांमध्ये वाद झाला. आणि रागाच्या भरात गोकुळने तरुणीला लाथ घातली आणि तिचे केस पकडून तिला मारहाण करण्यास सुरुवात केली आहे. आता या घटनेचा सीसीटिव्ही व्हायरल झाला आहे.

गोकुळ झा याला आज न्यायालयात हजर केले असता. त्याने माज्यावर चुकीची कारवाई करत. माज्या भावाला का ताब्यात घेतले असे सांगत त्याने न्यायालयात गोंधळ घातला. यावेळी न्यायाधीशांनी कायदेशीर प्रक्रियेत अडथळा आणण्याबाबत गुन्हा दाखल करण्याची तंबी दिल्यावर तो शांत झाला. यावेळी पोलिसांनी त्याची पोलिस कोठडीत रवानगी केली.

# इन्स्टाग्रामवर मैत्री, नंतर अत्याचार करून जबरदस्तीने गर्भपात

**■नवी मुंबई :** पनवेलच्या आदई गावात राहणाऱ्या एका १८ वर्षीय तरुणाने इन्स्टाग्रामवर मैत्री झालेल्या अल्पवयीन मुलीला लग्नाचे आमिष दाखवून तिच्यावर बलात्कार केल्याचा आणि त्यानंतर जबरदस्तीने तिचा गर्भपात केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. त्यानुसार खांदेश्वर पोलिसांनी आरोपी बंटी उर्फ यश प्रवीण दिपके या तरुणाविरोधात बलात्कारासह पोक्सोखाली गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणात पीडित मुलीचा गर्भपात करण्यास आरोपी बंटीची आई व इतर नातेवाईकांनी मदत केल्याचे आढळून आले आहे. त्यामुळे पोलिसांनी त्यांना देखील या गुन्ह्यात सहआरोपी केले आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, या घटनेतील १७ वर्षीय पीडित



अल्पवयीन मुलगी आणि आरोपी बंटी यांची दोन वषार्पुर्वी इन्स्टाग्रामवरून मैत्री झाली होती. पीडित मुलगी अल्पवयीन असल्याची माहिती असूनही आरोपी बंटी याने तिच्यासोबत प्रेमसंबंध निर्माण करून तिला लग्नाचे आमिष दाखवले. तसेच पीडित मुलीला आपल्या घरी बोलावून तिच्यासोबत अनेकवेळा शारीरिक संबंध प्रस्थापित केले. त्यामुळे पीडित मुलगी गरोदर राहिल्यानंतर तिने ही बाब बंटीला सांगितली. आरोपी बंटीची आई वैशाली दिपके हिने गत मे महिन्यात पीडित मुलीला बंटीसोबत त्यांच्या मूळ गावी नांदेड येथे पाठवले. येथील एका रुग्णालयात नेऊन तिचा जबरदस्तीने गर्भपात केला. त्यानंतर पीडित मुलीला पुन्हा तिच्या घरी आणुन सोडले. गत आठवड्यात पीडित मुलीचा गर्भपात झाल्याची माहिती तिच्या आईला समजल्यानंतर पीडित मुलीच्या आईने खांदेश्वर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यानुसार पोलिसांनी आरोपी बंटी व पीडित मुलीला गर्भपात करण्यास भाग पाडणारी त्याची आई वैशाली दिपके आणि अन्य दोन महिला प्रियंका व विशाखा यांच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे. अद्याप गुन्ह्यात कुणाला अटक करण्यात आली नसल्याची माहिती पोलिसांनी दिली.

# चोराच्या हिप्नोटाईज कांडमुळे सगळं उद्धवस्त

## काही समजायचा आत महिलेसोबत धक्कादायक घडलं!

**■भोर :** भोर तालुक्यातील नसरापूर येथे धक्कादायक घटना घडली आहे. येथे एका ६५ वर्षीय महिलेला हिप्नोटाईज करून तिच्याजवळचे साधारण तीन लाखांचे सोने लुटण्यात आले आहे. चोराने थेट हिप्नोटाईज करून महिलेच्या अंगावरचे दागिने चोरल्यामुळे आश्चर्य व्यक्त केले जात आहे. मिळालेल्या माहितीनुसार कमल शिवाजी रेणुसे (रा. नसरापूर) असे लूट झालेल्या महिलेचे नाव आहे.

**हिप्नोटाईज नेमकं कसं केलं?**

कमल रेणुसे या मंदिरातून बाहेर पडल्यानंतर अज्ञात व्यक्ती त्यांच्याजवळ आली. या व्यक्ती स्वतःला मी मंदिरात जात नाही असं सांगितलं. तसेच या मंदिरात माज्यातर्फे ९०० रुपये दान करा अशी विनंती केली. पुढे कमल रेणूसे यांना विश्वासात घेऊन दुचाकीवर बसवले आणि बनेश्वर रोडवरील काळूबाई मंदिराकडे घेऊन गेला. तिथे कथितरीत्या हिप्नॉटिझम करून कमल रेणुसे यांच्या गळ्यातील अडीच तोळ्याचे गंठण, हातातील अंगठी असा एकूण तीन लाखांचा ऐवज लंपास केला.

**सीसीटीव्ही फुटेज आले समोर**

शक्यतो चोर रात्रीच्या अंधारात चोरी करतात. कोणीही आजूबाजूला नसताना या चोऱ्या केल्या जातात. एखादा अट्टल चोरही गर्दी बघून चोरी करणं टाळतो. कारण एकदा तावडीत सापडलं तर लोक चोप देतील याची भीती चोरांना असते. मात्र या मास्कधारी अजब चोराने थेट हिप्नोटाईज करून महिलेचे लाखोंचे सोने लुटले आहे त्यामुळे या घटनेने नसरापूरमध्ये खळबळ उडाली आहे. विशेष म्हणजे या चोराचा आणि पीडित महिला त्याच्या गाडीवर बसल्याचे सीसीटीव्ही फुटेजमध्ये समोर आले आहे.



**नेमकं काय घडलं?**

मिळालेल्या माहितीनुसार कमल शिवाजी रेणुसे या सकाळी 10 वाजता नेहमीप्रमाणे त्यांच्या हरदेव हॉटेलकडे जात होत्या. हॉटेलकडे जाण्याआधी त्या नेहहमी श्री स्वामी समर्थ मंदिरात दर्शनासाठी जायच्या. नेहमीच्या शिरस्त्याप्रमाणे त्या आजदेखील स्वामी समर्थांचे दर्शन घेण्यासाठी थांबल्या. दर्शन घेतल्यानंतर त्या नेहमीप्रमाणे त्यांच्या हॉटेलच्या दिशेनेन निघाल्या. मात्र हीच संधी साधत एक अज्ञात मास्कधारी व्यक्ती त्यांच्या संपर्कात आली.त्यानेच नंतर हिप्नोटाईजच्या माध्यमातून कमल रेणुसे यांच्या अंगावरील दागिने लुटले.

**आरोपीचा शोध सुरू**

दरम्यान, या प्रकरणी राजगड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक राजेश गवळी यांच्या सूचनेनुसार हवालदार अजित माने यांनी घटनास्थळाची पाहणी करत ग्रामपंचायतच्या सीसीटीव्हींची तपासणी केली आहे. आरोपीचा शोध घेतला जात आहे. गावात ग्रामपंचायतीमार्फत लावण्यात आलेले सीसीटीव्ही कॅमेरे पोलिसांना तपासात मदत करत असून नागरिकांनी अनोळखी व्यक्तींबाबत अधिक सतर्क राहावे, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४०००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com